# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १०/०९/२०२४

➢ गैरकायदयाची मंडळी जमविणे :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | भादवि/ सिआरपी कलमान्वये | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पो.स्टे. राजापेठ अप क्र ५२२/२४ क ३३३,११५(२),३५२, ३५१(२), ३५१(३), २९६,१८९(२),१८९(४),१९१(२), १९१(३), १९० बीएनएस ४/२४ आर्म अंक्ट १३५ मपोका | कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६,२९४, १४३,१४४, १४७, १४८, १४९ भादवि सहकलम ४/२४ आर्म अंक्ट १३५ मपोका | जनता कॉलनी अमरावती | दि. ०९/९/२४ चे १३/०० वा<br><br>दा ता वेळ दि. ०९/९/२४ १८.३६ वा. | सुशिल गजानन सवई वय २६ वर्ष रा जनता कॉलनी अमरावती | रवि इगोले + ५ते ६ लोक | हकिकत अशा प्रकारे आहे की यातिल फि हे आज दि ०९/०९/२४ रोजी सकाळी १०/१५ वा मला इस्टाग्राम वर रवि इंगोले १२३४ या आय डी वरून मला हाय मॅसेज आला . त्यावरून मी माझे मोबाईलवरून त्याला रीप्लाय दिला कि मी तुला ओळखत नाही अस`म्हटले त्याने मला एका बाईचा फोटो माझे ईनस्टा आयडी वर पाठविला व हिला ओळखतो का असे विचारले मी त्याला नाही म्हटले त्याने मला ईन्सट्रा आय डी वरून कॉल केला व मला शिवीगाळ केली व मला येवुन भेट असे म्हटले त्यानंतर मी त्याला दुपारी ०१/०० वा दरम्यान रवि इंगोले व त्याचे सोबत पाच ते सहा लोक त्याचे नाव गाव मला माहीत नाही. असे माझे घरामध्ये जबरदस्तीने घुसले त्यावेळी रवि इंगोले ह्याचे हातात चाकु होता व काही लोकांच्या कमरेला चाकु दिसले त्यानी माझे घरातील सामानाची असाताव्यस्त फेकफाक केली व मला लाथाबुक्क्यानी नाकावर छातीवर पोटावर मारहान करून जिवाने खतन करून टाकण्याची धमकि दिली त्यानंतर माझे घरातुन निघुन घराचे आवाराचे समोरील रोडवर अश्लील भाषेत शिवीगाळ केली . हा तर ट्रेलर आहे पिक्चर बाकी आहे असे म्हणुन त्या सर्व लोकांनी घमकावुन तेथुन निघुन गेले त्यानंतर मी ११२ ला कॉल करून पोलीसांना बोलाविले व त्याना घडलेला प्रकार सांगीतला . तसेच रीपोर्ट देण्यास आलो . वरुन फिर्यादीचे जबानी रीपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ स्त्रि अत्यांचार :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | भादवि/ सिआरपी कलमान्वये | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पो.स्टे. नांदगाव पेठ अप क्र. २९२/२०२४ कलम ४९८ (अ), ३४ भादवी | कलम ४९८ (अ), ३४ भादवी | हैद्राबाद | ०४/१०/२००९चे ११-०० वा ते २२-२-२०२३ १२-०० वा दाखल.ता. वेळ दि ०९-९-२४ चे २२-५२ वा | एक महिला | पिडीत महिलेचे ०२ नातेवाईक | हकिकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी यानी संघमत करुन फि स दहा लाख रु माहेरुन आणण्याची मागमी केली फि ने नाही म्हटले असता तिल ा मारहाण करुन शारीरीक व मानसीक छळ केला. यातील आरोपी क्र १ हा दारु व सिगारेटचा व्यसनी असुन दारु पिवुन फि स शिविगाळ करुन मानसीक त्रास देत होता आरोपी क्र २ ने म्हटले ईतर मुलीचे आई वडिल किति हुडा देतात सोने देतता तुझ्या वडिलाने फत्त मुलाला विस ग्राम सोन्याची चैन व सात ग्राम ची अंगटी एवढे दिले कमीत कमी १० लाख रु द्यायला पाहीजे होते दोन्ही आरोपीने फि स मारहाण करुन शारीरीक व मानसीक छऴ केला. अशा फि. यांच्या जबानी व महिला सेल प्राप्त पत्रावरुन गुन्हा दाखल |

➢ घरफोडी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | भादवि/ सिआरपी कलमान्वये | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो.स्टे फ्रेजरपुरा. ७६०/२०२४ कलम ३०५(ए) , ३३१(१) बी. एन. एस. २०२३ | कलम ३८० ४५३, भादवि | उत्तम नगर, अमरावती. | . घ.ता. वेळ - दि. ०९.०९.२०२४ चे ११.०० वा. ते ११.१५ वा. दरम्यान.<br><br>दा.ता. वेळ - दि. ०९.०९.२०२४ चे १७.५४ वा. | जितेंद्र तुळशिरामजी बांगरे, वय ३७ वर्ष, व्यवसाय सोन्याचे दुकान, रा.नितीन विहार राजेंद्र नगर, | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की,यातील फिर्यादी यांचे उत्तमनगर येथे सोन्या चांदीचे ज्वेलर्सचे दुकान आहे ते दुकान रोज ११.०० वा ते १४.३० वा. पर्यंत सुरु ठेऊन पुन्हा सायंकाळी १७.०० वा. ते २१.०० वा. सुरु ठेवतात. नमुद घटना ता वेळी व ठिकाणी रोजच्या प्रमाणे ते सकाळी ११.०० वा. दुकानात आले तेव्हा दुकान उघडुन काळया रंगाची व कथीया रंगाची बँग ज्यात मुद्देमाल असलेले काऊंटरवर ठेवली व दुकानाची साफसफाई केली. त्यानंतर ते त्यांच्या दुकानाचे बाजुला असलेले द पीपल ऑनलाईन सेंटर नावाचे दुकान आहे त्याचे मालक श्री अमोल वाघमारे यांना पैसे देण्याकरीता नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फिर्यादी गेले असता त्यांच्या काऊंटरवर ठेवलेल्या दोन बाँग त्या मध्ये १) १,४०,०००/- रु. किमतीचे दोन तोळे वजनाचे सोन्याचे मणी लाँकेट डोरमणी, २) १,२०,०००/-रु. किमतीचे दिड किलो वजनाचे चांदीचे बिचवे, पायल, |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | महादेवखोरी, अमरावती. | | जोडवे , चांदीचे भांडे, त्यात वाटी, चमचे ,दिवे, मुर्ती असे साहित्य , ३) ३०,०००/- रु. रोख , ४) ००.०० रु. किमतीचे बांगरे ज्वेलर्स चे व्यवहाराचे ४ बुक्स तसेच माझे आधार कार्ड , पँन कार्ड, एस.बी. आय बँकचे दोन क्रेडीट कार्ड व एक ए.टी.एम. कार्ड, आर. बी एल बँकचे एक क्रेडीट कार्ड, एच.डी. एफ.सी. बँकचे क्रेडीट कार्ड व इको बँक याचे एक ए. टी. एम.कार्ड असा एकुण अंदाजे २,९०,०००/- रु. चा मुद्देमाल असलेल्या दोन बँग उघड्या दुकानात प्रवेश करुन कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | भादवि/ सिआरपी कलमान्वये | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे बडनेरा अप क्र.५५१/२४ कलम ३०५(b) भान्यास | कलम ३८० भादवि | धर्मजित रामदास डुमरे यांचे सोन्याचे दुकाना जवळ मौलाना आझ ाद मार्केट नवी वस्ती बडनेरा | दि.०९/०८/२४ चे १९.०० वा ते १९.३० दाखल ता वेळ- ०९/०९/२४ चे २२.१६ वा | विश्वजित रामदास डुमरे वय 60 वर्ष व्यवसाय सोन्याचे दुकान रा इ इंझाळपुरा नवि वस्ती बडनेरा ता जी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांची जुनी वस्ती बरीपुरा येथे सोहम ज्वेलर्स नावाचे सोन्याचे दुकान असुन ते नेहमी सकाळ संध्याकाळ उघडतात ते नेहमी दागीने सोबत घेवुन जातात व येतांना परत घेवुन येतात नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यील फिर्यादी यांनी आज दि. ०९/०९/२०२४ रोजी दुपारी ०३.० वा दरम्यान त्यांचे सोन्याचे दुकान उघडले व संध्याकाळी १९.० वा दरम्यान त्यांचे दुकानातील 150 ग्रॅम ते 175ग्रम सोन्याचे दागीने कि अं. 10,00000/- रु. चे त्यांचे जवळील पांढ-या बॅगमध्ये टाकुन ती बॅग त्यांचे मोटार सायकलचे डिक्कीत टाकली व डिक्की लॉक करुन मोटार सायकलने घरी जाण्यासाठई निघाले असता अं. 08.00 वा दरम्यान त्यांच्या भाऊ धर्मजीत डुमरे यांचे मौलाना आझाद मार्केट नवि वस्ती बडनेरा येथील सोन्याचे दुकानाजवळ थांबले व तेथील मोटार सायकल लावुन त्यांचे भावाचे दुकानाचे कॉउटर वर जावुन भावासोबत बोलत असता त्यांचे लक्ष त्याचे मोटार सायकल चे ड्किी कडे गेले असता त्यांची मोटार सायकलची डिक्की उघडी दिसली त्यांनी मोटार सायकल जवळ जावुन पाहिले असता अं. 150 ग्रॅम ते 175ग्रम सोन्याचे दागीने असलेली पांढरी रंगाची बॅग कि अं. 10,00000/- रु. ची चोरी गेल्याचे समजले अशा फि च्या जबानी रि वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ०२ | पोलीस स्टेशन गाडगे नगर अमरावती अपक्र. ७५८/२४ कलम- | कलम ३८० भादवि | मिल्क अँड मोर दुकान हर्षराज चौक मेघे कॉम्पलेक्स अमरावती | दि.०४.९.२०२४ चे रात्री १९.०० वा<br><br>दि.९.९.२०२४ चे १९.०७ वा | वैभव शेखर जगताप वय २४ वर्ष रा गजानन महाराज मंदिराच्या बाजुला महेन्द्र | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी यातील फिर्यादी फिर्यादि हा मिल्क अँड मोर च्या दुकानात काम करतो पॉपकॉन चा माल मी रँक मद्ये लावत असताना मी माझ्या जवळ असलेला विवो व्ही ५०मोबाइल कि अ. ६००० रँकमध्ये ठेवला व एका ग्राहकाला केक देवुन मि वापस मोबाइल घेण्याकरीता आलो असता मोबाईल ठेवलेल्या ठिकाणी मिळुन आला नाही. ते कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नोला जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३०५(a)बीए नएस | | | | कॉलणी अमरावती. | |
| ०३ | पोस्टे सिटी कोतवाली अमरावती शहर अप क्र ३४०/२०२४ कलम ३०३ (२) भा.न्या.सं | कलम ३७९ भादवि | लालसाई साडीज ऑण्ड ड्रेस मटेरिअर दुकान समोर तखतमल मार्केट अमरावती | घ.ता.वेळ दिनांक ०९.०९.२०२४ चे ०२.५२ वा दरम्यान<br><br>दा.ता.वेळ ०९.०९.२०२४ चे १८.३२ वा | एक महिला | हकिकत अशा प्रकारे आहे की नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी हे चांदुर बाजार येथुन खरेदी करणे करीता अमरावती येथे आले असता फिर्यादी चे खांद्यावरील पर्स मध्ये एक लेदर ची पर्स कॉफी रंगाची होती कोणीतरी अज्ञात महीलेने फि चे खांद्यावरील बॅग मधली लहाण पर्स ज्या मध्ये नगदी २०० चे ,१०० चे आणी ५०० चे नोटा व काही चिल्लर पैसे अशे एकुण २२,०००/- रू चा माल व अभिनंद बँक चे ए.टी.एम. पॅन कार्ड आधार कार्ड इलेक्शन कार्ड असलेली छोटी पर्स चोरुन नेली अशा फी चे जबाणी रि.वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ इतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | भादवि/ सिआरपी कलमान्वये | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | बडनेरा अप न. ५५०/२०२४ कलम २८५ BNS | कलम २८३ भादवि | जयहींद चौक नवि वस्ती बडनेरा | घ ता वेळी - ९/९/२४ चे १८.५० वा<br>दा ता वेळ - ९/९/२४ चे २०.२४ वा | पोउपनि. तुषार गावंडे, पो.स्टे. बडनेरा, अम. शहर. | अमीन उल्ला खान शमी उल्ला खान वय ३२ वर्ष रा अकबर नगर पठाण नगर अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील तिन चाकी प्रवासी ऑटो क्र. MH-४९-AF-४६७४ हा सार्वजनिक रस्त्यावर नागरिकांना व वाहतुकीस धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभा करून ठेवलेला मिळुन आला वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ अकस्मात मृत्यु :-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | भादवि/ सिआरपी कलमान्वये | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो स्टै फ्रेजरपुरा मर्ग | कलम १७४ जा.फौ. | ग्राम पोहराबंदी स्मशानभुमी | नरेश अजाबराव जवंजाळ | अजाबराव श्रावन जवंजाळ वय ७० वर्ष | हकीकत अशा प्रकारे आहे की, दि. ०८/०९/२०२४ चे ८.०० वा दरम्यान फि चा मुलगा हा घरातुन कोठेतरी निघुन गेला व रात्रभर घरी परत आला नाही तर फि ची पत्नी हीने फिला सांगितले नरेश हा शेतात गेला होता आणि शेता कमी पिकामुळे तो चिंचेत होता |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **क्र.६६/२० २४ क. १९६ BNSS २०२३** | | जवळ अमरावती | वय ३६ वर्ष रा. ग्राम पोहराबंदी ता. जि अमरावती | रा. ग्राम पोहराबंदीता. जि अमरावती | अणि त्यामुळे दारू सुध्दा पिवुन पिण्यासाठी पैसे मागत होता तो शेतात शेती ना पिकामुळे व कमी उत्पन्न होत असल्याने नरेश याला नैराश्य आले म्हणुन नरेश घरुन निघुन गेला तर आम्ही सर्वगावामध्ये शोध घेतला परुतु मिळुन आला नाही फिला प्रविण बेडकें यांनी फि च्या घरी येवुन सांगितले क नरेश याने अंगातील शर्टाने झाडावर गळफास घेवुन आत्महत्या केली. तर फि त्या ठिकाणी गेले असता नरेश याने अंगातील शर्टाने झाडावर गळपफास घेवुन आत्महत्या केली. अशा फि च्या जबानी रिपोट वरून इंविन मेमो **प्रमाणेसदरचा मर्ग दाखल** |